# प्रकरण दूसरे

---

## श्री गाडगे महाराज मिशनची स्थापना व कार्यविस्तार

# प्रकरण दुसरे

# श्री गाडगे महाराज मिशनची स्थापना व कार्यविस्तार

आधुनिक महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासाचा आढावा घेत असताना श्री गाडगे महाराज मिशन मुंबई या संस्थेने शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा अभ्यास करणे अटळ आहे. या मिशनने केलेले कार्य अत्यंत महत्वाचे आहे.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासासाठी अनेक समाजसुधारकांनी शिक्षणक्षेत्रातील धुरीणांनी आपले सर्व आयुष्य वेचले आहे. गरीब, गांजलेल्या, मागासलेल्या समाजासाठी म.जोतिबा फुले यांच्यापासून डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, गाडगे महाराजांपर्यंत अनेकांनी मोलाचे कार्य केले आहे. दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा यात पिचत पडलेल्या दु:खी समाजाचा उद्धार करायचा असेल तर शिक्षणाशिवाय दुसरे प्रभावी साधन नाही हे गाडगेबाबांनी ओळखले होते. गाडगेबाबा स्वत: निरक्षर होते तरी ते हाडाचे शिक्षक व शिक्षण प्रसारक होते.त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून लोकशिक्षण केले ते केवळ कीर्तनातून उपदेश करून थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या विचाराला कृतीची जोड देऊन मिशनची स्थापना केली.

श्री गाडगे महाराज मिशन मुंबई ही सामाजिक व शैक्षणिक कार्य करणारी सेवाभावी संस्था आहे. संपूर्ण महाराष्ट्रात या संस्थेमार्फत अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रम सुरू आहेत. समाजातील अनुसूचित जाती जमाती, विमुक्त व भटक्या जाती आणि बहुजन समाजातील मुला-मुलींच्या शैक्षणिक व सामाजिक विकासाचे मिशनने सतत भान ठेवले आहे.

या संस्थेने श्री संत गाडगेबाबांच्या १० कलमी संदेशनुसार कार्य करण्यासाठी गेल्या ५० वर्षात अनेक शाखा व उपशाखा कार्यरत केलेल्या आहेत. त्यामुळे आज ४0000 पेक्षा अधिक मुले-मुली, निराधार बालके, वृद्ध, अंध-पंगू, रोगी मिशनच्या सेवा कार्याचा लाभ घेत आहेत.

याशिवाय अंधश्रद्धा निर्मूलन, हिंसाबंदी, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण इत्यादी क्षेत्रातही मिशन कार्यरत आहे.

प्रस्तुत प्रकरणात श्री गाडगे महाराज मिशनची स्थापना, विकास, तिची ध्येयधोरणे, उद्दिष्ट्ये, वैशिष्ट्ये व एकूण ५० वर्षातील कार्याची विस्तृत चर्चा व चिकित्सा केली आहे.

## श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई स्थापना :

निराधार आश्रीतांना अज्ञानाकडून ज्ञानाकडे घेऊन जाणारा त्यागी मानवतावादी राष्ट्रीय संत गाडगे महाराज उर्फ डेबुजी झिंगराजी जाणोरकर हे श्री गाडगे महाराज मिशनचे संस्थापक होत.

त्यांनी स्वत:च्या प्रभावी कतृत्वाने, वक्तृत्वाने, कीर्तनांनी व अंगमेहनतीने महाराष्ट्रीय समाजातील अनिष्ठ रूढी व परंपरांचे उच्चाटन, अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धा निर्मूलन, हिंसाबंदी, नशाबंदी... इत्यादी विविध क्षेत्रात स्वत:च्या झाडू-खराटयाच्या आणि श्रमप्रतिष्ठेचा कायम आदर्श निर्माण केला. आपले हे कार्य अखंडपणे पुढे सुरू ठेवण्यासाठी त्यांनी दिनांक ८ फेब्रुवारी १९५२ रोजी 'श्री संत गाडगे महाराज मिशनची' मुंबई या ठिकाणी स्थापना केली.[१]

श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई - ४. ही सेवाभावी संस्था इ.स.१८६० च्या २१ व्या कायदयानुसार क्रमांक - २७५८ वर मुबंई सार्वजनिक न्यास कायदा १९५० अन्वये क्रमांक एफ ९२१ वर पंजिकृत करून घेतली आहे.[२]

श्री गाडगे महाराज मिशनच्या स्थापनेवेळी गाडगेबाबांनी आपल्या विश्वासातील काही मंडळींचा मिशनच्या पदाधिकाऱ्यांत समावेश केला होता. मिशनचे प्रारंभीचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे होते.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | अच्युतराव गुलाबराव देशमुख |
| उपाध्यक्ष | : | श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर |
| | | श्री.रा.ब. जयंतीलाल मानकर |

खजिनदार : जे.व्ही.जोशी

जनरल सेक्रेटरी : यशवंत तुकाराम शिंदे

सभासद : १. जी.डी.तपासे माजी मंत्री व राज्यपाल

२. पी.अे.म्हात्रे

३. एस.डी.जाधव

४. शेठ दुर्गा पांडुरंग दुर्गय्या

५. ह.भ.प.कैकाडी महाराज

६. श्री.विश्वनाथ वाघ

७. बबन महाराज कळसकर

८. यशवंत माने, गोंदवलेकर

९. एस.बी.भोजने वकील

१०. प्रभाकर गणपत जाधव

११. ह.भ. गुणवंतराव चराटे [३]

❖ **गाडगेमहाराज मिशनचे ब्रीदवाक्य व बोधचिन्ह :**

'सेवा परमो धर्म:' हे गाडगे महाराज मिशनचे ब्रीदवाक्य आहे. 'सेवा परमो धर्म:' याचा अर्थ 'सेवा हाच धर्म' असा आहे.

❖ **बोधचिन्ह :** एका गोलाकार वर्तुळामध्ये गाडगेबाबांचा फोटो व गाडगे आणि पुस्तक आहे. गोलाकार वर्तळाच्या वरच्या बाजूला गाडगे महाराज मिशन मुंबई ४ तर खालच्या तळाकडील भागावर 'सेवा परमो धर्म:' असे लिहले आहे.[४] गाडगे महाराज मिशनचे बोधचिन्ह ओंकारनाथ जोशी या सेवकाने तयार केले आहे.

❖ **गाडगे महाराज मिशनची व्याख्या :**

'श्री गाडगे महाराज यांनी आपल्या हयातीत निर्माण केलेल्या विश्वस्त किंवा अन्य संस्था आणि त्यानंतर मिशनने सुरू केलेली केंद्रे किंवा चालविण्यास घेतलेल्या अन्य संस्था यांचा संघ म्हणजे श्री गाडगे महाराज मिशन होय.'

### ❖ मुख्य कचेरी :

'एक्झिक्युटिव्ह बोर्ड ठरवील त्याप्रमाणे मिशनची मुख्य कचेरी, शाखा व केंद्रे ठिकठिकाणी राहतील. श्री संत गाडगे महाराज व श्री गाडगे महाराज मिशनने यांनी स्थापन केलेल्या संस्था आणि केंद्रे मिशनच्या निरनिराळया शाखा समजण्यात येतील'.[५] (दि. १.०६.१९७१ पासून अंमलात आलेल्या मिशनच्या घटना दुरूस्ती नुसार.)

## गाडगे महाराज मिशनची ध्येय व धोरणे :

श्री संत गाडगे महाराज यांनी सांगितलेल्या दहा कलमी संदेशानुसार कार्य करण्यासाठी गाडगे महाराज मिशनची विशिष्ट ध्येयधोरणे ठरविलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे -

१. जनता व व्यक्ति यांना त्यांची स्वतःची उन्नती साधण्यास मदत करून शक्य त्या सर्व मार्गांनी मानवी सेवा करण्याचे शिक्षण देणे.

२. मिशनच्या व्यवस्थेखाली किंवा देखरेखेखाली, मानवाच्या व प्राणीमात्रांच्या हिताकरीता धर्मशाळा, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, शैक्षणिक संस्था व वसतिगृहे, आश्रमशाळा, दवाखाने, गोशाळा, रूग्णालये, गोरगरिबांकरिता घरे, भिकाऱ्यांच्यासाठी झोपडया स्थापन करणे व चालविणे किंवा मिशनच्या ध्येयप्रणालीप्रमाणे ध्येय असणाऱ्या अशा संस्था सामील करून घेणे व त्या सहकार्याने चालविणे.

३. शक्य त्या सर्व मार्गांनी 'अहिंसे' च्या तत्वांचा प्रसार करणे.

४. मिशनच्या कार्याच्या निरनिराळया शाखा चालविण्याकरिता आजीव सेवकांस शिक्षण देऊन तयार करणे आणि त्यांच्या हयातीत, त्याच्या साध्या राहणीकरीता आवश्यक ती तरतूद करणे.

५. समाजघातकी कृत्ये, अनैतिक वर्तन, दुर्गुण, व हिंसा यांचे उच्चाटन करण्यांकरिता भजन, कीर्तन व शैक्षणिक प्रचाराद्वारे सांस्कृतिक व नैतिक विकास घडवून आणणे.

६. मानव व इतर प्राणीमांत्रामध्ये विश्वशांती, सहिष्णुता व बंधुभाव निर्माण करणे.

७. मानवी स्वास्थ्याकरिता, अभ्युक्ष्याकरिता शांततामय व नि:स्वार्थ मार्गानी प्रयत्न करणे.

८. वरील उद्देश पार पाडण्याकरिता वाचनालये काढणे, वाङ्मय प्रसिद्ध करणे व नियतकालिके काढणे (मिशन घटनादुरूस्तीप्रमाणे)

९. जनतेच्या कल्याणाकारिता खादीचे सर्वांगीण उत्पादन व विविध ग्रामोद्योग यासारखे विविध कार्यक्रम हाती घेणे.[६]

दि.३० जानेवारी १९८२ रोजी १० वाजता श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा, वज्रेश्वरी येथे भरलेल्या श्री गाडगे महाराज मिशनच्या जनरल बॉडीच्या सभेत सुधारीत घटनेस मंजूरी मिळाली. त्यानुसार गाडगे महाराज मिशनची ग्रामीण विकास कार्यक्रमातील प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे ठरविण्यात आली.

❖ **अ.सामाजिक आर्थिक दर्जा :**

बहुजन समाजातील गोरगरीब लोकांचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी -

१. अंबर चरखा वा इतर कुटीर उद्योगांद्वारे उत्पन्न वाढविणे.

२. पुर्नवसनाकरिता कर्ज देणे.

३. पिण्यायोग्य पाणी व निवाऱ्याची सोय करणे.

❖ **ब. शेतीसाठी जमीन :**

उत्पन्नाच्या दर्जा वाढविण्यासाठी -

१. संकरीत प्रकल्प हाती घेणे.

२. शेतीकामाच्या कृषी तंत्रज्ञानात भर घालणे.

३. शेती उत्पन्न वाढविण्यासाठी चांगली बी बियाणे पुरविणे.

४. वृक्षलागवडीसाठी रोपटी पुरविणे.

५. पाटबंधाऱ्यांच्या कामाच्या सुविधा निर्माण करणे.

६. शेती कसण्यासाठी व उदरनिर्वाहासाठी कर्ज उपलब्ध करून देणे.

७. जनावरे खरेदीसाठी आर्थिक मदत करणे.

यासाठी भारत ॲग्रो इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन उरळीकांचन व गुजरात येथील विद्यापीठ तसेच इतर कृषी संस्थांकडून वरील बाबतीत सहकार्य मिळविणे.

❖ **क. सार्वजनिक आरोग्यासाठी :**

ग्रामीण भागातील लोकांच्या सार्वजनिक आरोग्याचा दर्जा सुधारण्यासाठी -

१. सर्वसाधारण आरोग्य तपासण्यासाठी शिबीरे, तसेच नेत्रशिबीर कान, घसा, नाक तपासणीसाठी शिबीरे व अन्य वैद्यकीय उपक्रम चालू करणे व राबविणे.

२. मोफत व सवलतीच्या दराने औषधे पुरविणे व वैद्यकीय मदत करणे.

३. घराघरातून निर्धूरचुली पुरविण्याची व्यवस्था करणे.

❖ **ड. शिक्षण :**

शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी -

१. शाळांच्या नवीन इमारती बांधणे अथवा असलेल्या दुरूस्त करून घेणे.

२. मुलामुलींसाठी वसतिगृहाची सोय करणे.

३. उच्चशिक्षणासाठी तसेच शिक्षकांच्या विविध प्रशिक्षणासाठी शिष्यवृत्यांची सोय करणे.

४. मुला मुलींना माफत गणवेश पुरविणे.

५. शाळांसाठी लागणारे शैक्षणिक साहित्य व खेळांचे साहित्य पुरविणे.[७]

❖ **आश्रमशाळा व वसतिगृहे स्थापन्याची उद्दिष्टये :**

गाडगे महाराज मिशनने अनेक ठिकाणी मुलामुलींची वसतिगृहे व आश्रमशाळा स्थापन केलेल्या आहेत. आश्रमशाळा व वसतिगृहे स्थापन करण्याची उद्दिष्ते खाली दिल्याप्रमाणे -

१. मुलांना उत्कृष्ट विद्यार्थी आणि स्वंयपूर्ण व सुसंस्कृत भारतीय नागरिक तयार करणे.

२. विद्यार्थ्यांना प्राचीन आश्रमीय वातावरणात ठेवून त्यांच्यावर अव्यावत शिक्षणाचा व ज्ञान विज्ञानाचा संस्कार करणे.

३. विद्यार्थ्याने संस्थेत प्रवेश मिळाल्यानंतर परिपूर्ण विद्याभ्यास करूनच बाहेर पडावे.[८]

## गाडगेमहाराज मिशनच्या कार्य विस्ताराचे प्रमुख टप्पे :

गाडगे महाराज मिशनची स्थापना दिनांक ८ फेब्रुवारी १९५२ रोजी झाली. सन १९५२ ते २००२ या कालखंडातील मिशनच्या कार्यविस्ताराचा अब्यास करण्यासाठी सोयीच्या दृष्टीने एकूण पाच टप्पे पाडले आहेत.त्या पाच टप्प्यांचा कालखंड आणि प्रत्येक टप्प्यावरील कार्याची संख्यात्मक वाढ यांचा तपशील पुढील प्रमाणे -

| अ.नं. | कार्य विस्तार टप्पा कालखंड | शाखा विस्तार संख्या |
|---|---|---|
| १ | इ.स.१९५२ ते १९६२ | १८ |
| २ | इ.स.१९६२ ते १९७२ | १९ |
| ३ | इ.स.१९७२ ते १९८२ | १९ |
| ४ | इ.स.१९८२ ते १९९२ | २० |
| ५ | इ.स.१९९२ ते २००२ | २९ |

[९]

(सदरचा तक्ता गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव अंक १९५२- २००२ यातील पृष्ठ क्र. १६ ते १८ वरून तयार केला आहे.)

## कार्यविस्तार :

## पहिला टप्पा (सन १९५२ ते १९६२)

श्री गाडगे महाराज मिशन ही संस्था सेवायोगी संत गाडगे महाराज यांच्या १० कलमी संदेशानुसार कार्य करणारी एक शैक्षणिक व सामाजिक संस्था आहे. इ.स. १९५२ ते १९६२ या कालखंडामध्ये या संस्थेने वेगवेगळ्या ठिकाणी आश्रमशाळा,

वृद्धाश्रमे, विद्यार्थी वसतिगृहे, कन्याछात्रालये, कन्या प्रशाला एकूण अठरा शाखा स्थापन केल्या आहेत.

❖ **गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा, राहुरी जि. अहमदनगर :**

या शाखेची स्थापना सन १९५४ मध्ये झाली. या शाखेचे वैशिष्टय म्हणजे ही शाखा स्वत: गाडगे महाराज यांनी स्थापन केलेली आश्रमशाळा असून महाराष्ट्रातील पहिली आश्रमशाळा आहे. या शाळेच्या स्थापनेसाठी त्यावेळेचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गाडगेबाबांचे परमभक्त कै. बाळासाहेब खेर, माजी मंत्री कै. गणपतराव तपासे, कै. तुकाराम शेळके, कै. बाबुराव दादा तनपुरे इत्यादी. लोकांनी मोलाचे सहकार्य केले. या शाळेत सद्यस्थितीत ३00 निवासी व २00 अनिवासी असे एकूण ५00 विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

कै. यशंवतराव चव्हाण, वेणूताई चव्हाण, वसंतराव नाईक, मदर तेरेसा इत्यादी मान्यवरांनी या शाळेस भेटी देऊन गौरवोद्गार काढलेले आहेत."[१०]

❖ **गाडगे महाराज परधाम वृद्धाश्रम, वालगांव जि. अमरावती :**

अमरावती जिल्हा गाडगेबाबांची कर्मभूमी असलेला एक प्रमुख जिल्हा होता. या जिल्हयात मिशनमार्फत अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रम सुरू आहेत. त्यापैकी श्री गाडगे महाराज परधाम वृद्धाश्रम हा एक उपकम आहे. ज्या पवित्र ठिकाणी गाडगेबाबांनी आपला देह ठेवला. त्याच जागेवर सन १९५७ साली या वृद्धाश्रमाची स्थापना करण्यात आली. या वृद्धाश्रमात ३0 वृद्ध व्यक्ती आपले आयुष्य आनंदाने घालवत आहेत. येथील वृद्धांच्या व्यवस्थेसाठी, संचालक, व्यवस्थापक आणि २ आचारी कार्यरत आहेत. या वृद्धाश्रमाची मिशनच्या मालकीची एक एकर जमीन आहे.[११] या वृद्धाश्रमाचे वैशिष्ट्ये म्हणजे सन १९५२ ते १९६२ या कालखंडातील गाडगे महाराज मिशनचा हा एकमेव विगर शैक्षणिक उपक्रम आहे.

❖ **श्री गाडगे महाराज विमोचित जाती आश्रमशाळा गोंदवले बु.॥ ता.माण, जि.सातारा :**

सातारा जिल्हा हा कै.यशवंतराव चव्हाण, कर्मवीर भाऊराव पाटील व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या अथक परिश्रमाने पावन झालेला महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हा आहे. या जिल्हयातील कायम दुष्काळी तालुका म्हणून ओळख असणाऱ्या माण तालुक्यातील गोंदवले बु या गावी संत गाडगेबाबांच्या कृपा आशिर्वादाने श्री. यशवंतराव कृष्णाजी माने, ( विद्यमान कार्यकारी अध्यक्ष, गाडगे महाराज मिशन ) यांच्या अथक परिश्रमातून दि.९.६.१९५८ रोजी सदर शाखेची स्थापना झाली. या आश्रमशाळेत एकूण १५0 विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यासाठी ४ शिक्षक व ५ शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत. या शाळेमध्ये दारिद्रय रेषेखालील ग्रामीण तरूणांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे म्हणून 'लोकर विणकाम' हा व्यवसायिक प्रकल्प राबविला जातो.[१२]

❖ **संत गाडगे महाराज वसतिगृह, भुसावळ जि.जळगाव :**

ग्रामीण भागातून शहरी भागात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची अन्न, वस्त्र, निवारा इ. मूलभूत गरजांची सोय झाली तरच ग्रामीण भागातील गरीब व मागासवर्गीय विद्यार्थी शहरात शिक्षण घेऊ शकतो या दृष्टिकोनातून मिशनमार्फत काही वसतिगृहे चालविली जातात. भुसावळ येथे वसतिगृह त्यापैकीच एक होय. या वसतिगृहाची स्थापना सन १९५८ मध्ये करण्यात आली. या वसतिगृहात एकूण ४२ विद्यार्थी आहेत. या वसतिगृहाच्या देखरेखीसाठी व प्रशासनासाठी १ अधिक्षक व १ स्वंयसेविका कार्यरत आहे. या वसतिगृहाचे संचालक श्री.गोकुळ सोनवणे महाराज हे अश्यपृश्यता निर्मूलन, दारूबंदी इ.विषयांवर कीर्तन व कलापथकाचे कार्यकम करून लोकजागृतीचे कार्य करतात.[१३]

❖ **श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह, कुर्ला - मुंबई:**

मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त महानगरात गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अशक्य आहे. ते शक्य व्हावे या उद्देशाने मिशनमार्फत झोपडपट्टी तसेच

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

निम्न आर्थिक स्थितीत असलेल्या समाजातील विविध जाती-धर्मीय विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी उपलब्ध करून देण्याच्या उद्दिष्टाने या वसतिगृहाची सन १९५८ साली स्थापन केली. आरंभी विद्यार्थीसंख्या २० इतकी कमी असली तरी सन २००२ मध्ये ही संख्या १०० इतकी होती. सदरच्या वसतिगृहाची इमारत मिशनच्या मालकीची असून या वसतिगृहाचे संचालक श्री. चौधरी हे कार्यरत आहेत. या वसतिगृहाच्या प्रशासनसनासाठी १ अधिक्षक, १ सहाय्यक, ३ स्वयंपाकी असा सेवक वर्ग आहे. कीर्तन, भजन, स्वच्छता मोहिम, क्रीडा स्पर्धा इ. सांस्कृतिक व सर्वांगीण विकासाचे कार्यक्रम प्रत्येक वर्षी १२ ते २२ डिसेंबर या कालावधीत गाडगेबाबांच्या पुण्यतिथी प्रित्यर्थ साजरे केले जातात. तसेच गुडी पाडव्याच्या दिवशी अनाथ, अंध-पंगू, रोग्यांना भोजन व वस्त्रदान केले जाते.[१४]

❖ **गाडगे महाराज कन्याछात्रालय - मिरज :**

या छत्रालयाची स्थापना मिरज येथे दि. १४. ४. ५९ रोजी गाडगे महाराज मिशनच्या पुढाकाराने केली आहे. येथे ६५ विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. सदरच्या शाखेचे नियंत्रण अधिक्षिका श्रीमती आरेपाडकर यांच्याकडे असून त्यांना सहकार्य करण्यासाठी २ स्वयंपाकी आहेत.[१५]

❖ **श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा, भिवाळी जि. ठाणे :**

श्री नित्यानंद महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भिवाळी भूमीत व वज्रेश्वरी या ऐतिहासिक व धार्मिक स्थळाच्या सानिध्यात मिशनमार्फत १४ जून १९६० रोजी सदरच्या शाखेची सुरूवात झाली. सर्वात जुनी आदिवासी आश्रमशाळा म्हणून या शाखेचा नावलौकिक आहे. या शाखेमध्ये ११७ आदिवासी विद्यार्थी, १४ इतरमागास आणि १४ बिगर मागास विद्यार्थी असे एकूण १४५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[१६]

❖ **ओतूर जि. पुणे येथील शाखा :**

छ. शिवरायांच्या चरण स्पर्शाने व त्यांच्या कर्तृत्वाचा वारसा असलेल्या पुणे जिल्हयात जुन्नर परिसरातील ओतूर या गावी श्री. प्रल्हाद मारूती पाटील यांनी

गाडगेबाबांच्या कार्याचा वारसा घेऊन १ जून १९६० राजी गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा या शाखेची प्रथम स्थापना केली. सुरूवातीस या शाखेमध्ये ३० विद्यार्थी होते. सद्या येथील विद्यार्थी संख्या ६५० इतकी आहे. आदिवासी विद्यार्थ्यांची राहण्याची सोय व्हावी म्हणून सन १९६० मध्ये गाडगे महाराज आदिवासी विद्यार्थी वसतिगृह सुरू केले आहे. त्यामध्ये ८८ विद्यार्थी आहेत. बहिस्थ व दूरस्थ विद्यार्थ्यांच्या भोजन व राहण्याच्या व्यवस्थेसाठी सन १९६० मध्येच जनता विकास विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना केली आहे. स्त्री ही राष्ट्राची शक्ती आहे. या शक्तीचा विकास करण्याच्या हेतूने मिशनने १९६२ साली मातोश्री कुंतामाता कन्या छात्रालय सुरू केले असून येथे मुलींच्या १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय झाली आहे. आज एकूण ६१ मुली या छात्रालयाचा लाभ घेत आहेत.[१७]

**❖ श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह, सातारा :**

सातारा हे शहर मराठेशाहीची अखेरची राजधानी. शिक्षणासाठी येथे येणाऱ्या दुरस्थ विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी श्री गाडगे महाराज मिशनने इ.स.१९६१ साली सदरच्या वसतिगृहाची स्थापना केली. या वसतिगृहात स्थापनेपासून आज अखेर फक्त ४२ विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जातो. या विद्यार्थी वसतिगृहात इयत्ता ५ वी ते १० पर्यंतच्या मुलांना विनामुल्य प्रवेश दिला जातो. या विद्यार्थ्यात अनुसूचित जाती, भटक्या विमुक्त जाती व मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समावेश आहे. अधिक्षक म्हणून बी.एस.साठे सद्या हे काम पाहतात.[१८]

**❖ श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा चालतवाड.जि.ठाणे :**

शिक्षण व समाजविकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाजसुधारणेसाठी शिक्षणाची गरज ओळखून ठाणे जिल्हयातील आदिवासी मुलांना शिक्षण देण्याच्या हेतूने मिशनने या शाखेची स्थापना एप्रिल १९६२ मध्ये केली आहे. या शाळेत ३२० विद्यार्थी व ७ शिक्षक आहेत. याशाखेमार्फत चालतवाढ येथील आदिवासी लोकांना शेतीविषयक अत्याधुनिक माहिती मिळावी यासाठी शेतीची प्रात्यक्षिके दाखविली

जातात. तसेच वृक्षारोपण उपक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षणाचे शिक्षण दिले जाते.[१९]

### ❖ मातोश्री सखुबाई कन्या प्रशाला, पंढरपूर.जि.सोलापूर :

श्री गाडगेबाबांच्या कार्यकर्तृत्वाने जी भूमी गाजली त्या पंढरपूर तीर्थक्षेत्री पददलितांच्या विशेषत: मुलींच्या शिक्षणाची गैरसोय जाणवल्यावर इ.स.१९६२ मध्ये या प्रशालेची मिशनमार्फत स्थापना करण्यात आली. स्थापनेवेळी १६ विद्यार्थीनी, ३ शिक्षक, १ शिपाई १ लिपीक एवढाच या शाखेचा व्याप होता.आज एकूण ६0३ विद्यार्थीनी येथे शिक्षण घेत आहेत त्यासाठी १७ शिक्षक व ७ शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग आहे.

या शाळेची इमारत मिशनच्या मालकीची असून त्यामध्ये २१ वर्गखोल्या आहेत. या शाळेला डॉ.कृ.शे.मार्डीकर प्रतिष्ठान, सोलापूरद्वारे 'सुंदरशाळा' हे प्रमाणपत्र प्राप्त आहे.[२०]

### सारांश :

सन १९५२ ते १९६२ या कालखंडात गाडगे महराज मिशन संचलित एकूण १८ वेगवेगळया शैक्षणिक व सामाजिक शाखांची स्थापना झाली आहे. या कालखंडातील मिशनच्या कार्याचे वैशिष्टये म्हणजे महाराष्ट्रातील पहिली आश्रमशाळा राहुरी येथे सुरू झाली. त्याशिवाय संत गाडगे महाराज मिशनने १९५४ मध्ये १ वृद्धाश्रम, ४ प्राथमिक आश्रमशाळा, १ विमोचित जाती-जमातीच्या मुलामुलींसाठी आश्रमशाळा, ८ विद्यार्थी वसतिगृहे व ३ कन्या प्रशाळा स्थापान केल्या आहेत. मिशनच्या या कार्यामुळे मागासलेल्या व आदिवासी समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणाची व राहण्याची उत्तम सोय झाली.

## दुसरा टप्पा : (इ.स.१९६२ ते १९७२)

नव महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मिशनच्या कार्याला विशेष चालना मिळाली कारण कै.यशवंतराव चव्हाण यांनी शासकीय पातळीवरून मिशनला भरपूर सहकार्य केले.त्यामुळे या कालखंडात नागरवाडी, ब्रम्हपुरी, सिताखंडी, वाशिंद, पंढरपूर, दहिगांव,

ओतूर, पुणे, अहमदनगर, राहुरी उमरी, कुर्ला इत्यादी अनेक ठिकाणी एकूण १९ शाखा कार्यान्वित झाल्या.

❖ **श्री गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा नागरवाडी, जि. अमरावती :**

अमरावती जिल्हयातील नागरवाडी परिसरातील आदिवासी व गोरगरीब मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी गाडगेबाबांचे परमभक्त कै. अच्युतराव दादासाहेब देशमुख यांच्या पुढाकाराने मिशनद्वारे सन १९६२ साली प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली. त्यानंतर या शाखेला जोडूनच सन १९७२ मध्ये माध्यमिक आश्रमशाळा सुरू केली.

जेथे विद्यार्थी मिळविण्याकरिता शिक्षकांना गावोगावी फिरावे लागत होते. तेथे आज श्री गाडगेबाबांच्या आर्शिवादाने व बापूसाहेब देशमुख यांच्या अथक परिश्रमाने ६00 विद्यार्थी त्या आश्रमशाळेतून शिक्षणाचा लाभ घेत आहेत. ६00 पैकी ४00 विद्यार्थी निवासी आहेत हे विशेष होय. [२१]

❖ **श्री गाडगे महाराज प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळा व वसतिगृह, उमरी. जि. यवतमाळ :**

श्री संत शिरोमणी गाडगेबाबांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या जागेवर उमरी रोड, ता. केळापूर येथे मिशनमार्फत तीन शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत.

१. आदिवासी आश्रमशाळा

२. आदिवासी विद्यार्थी वसतिगृह-वरील दोन्ही शाखेची स्थापना सन १९६३ मध्ये साली झाली आहे.

३. श्री. गाडगे महाराज माध्यमिक आश्रमशाळा व वसतिगृहाची स्थापना जून १९७२ मध्ये झाली आहे. आदिवासी आश्रमशाळेत १२0 मुलांची मान्यता असून माध्यमिक विद्यालयात ६0 विद्यार्थी आहेत. सद्यस्थितीत वसतिगृहामध्ये १८0 विद्यार्थी भोजन व निवासाचा मोफत लाभ घेत आहेत. वरील सर्व शाखेत एकूण १३ शिक्षक व ३ शिक्षकेत्तर कर्मचारी व १ आचारी कार्यरत आहे. [२२]

या शाखांमार्फत आदिवासी समाज सुधारणेसाठी दारूबंदी, अंधश्रद्धा निर्मूलन, कुटुंबनियोजन इ. अनेक प्रकारचे लोककल्याणकारी कार्य केले जाते. या कार्यामध्ये येथील शाखेचे संचालक व श्री गाडगे महाराज मिशनचे चेअरमन रा.सु. घोंगटे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांना त्यांच्या कार्याबद्दल 'आदिवासी सेवक', 'दलित मित्र', 'विदर्भभूषण' व इतर अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

सदरच्या शाखेस महाराष्ट्र शासनाने सन १९९२- १९९३ चा 'आदिवासी सेवक संस्था' पुरस्कार दिला आहे.[२३]

❖ **श्री गाडगे महाराज प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा आणि विद्यार्थी वसतिगृह ब्रम्हपुरी, ता.कोरेगांव जि. सातारा :**

"ज्याला घडेना पंढरी | त्याने यावे ब्रम्हपुरी ||"

अशी उपमा ज्या गावाला गाडगेबाबांकडून मिळाली आहे ते ब्रम्हपुरी गांव कृष्णा नदीच्या तीरावरती सातारा जिल्हयातील कोरेगांव तालुक्यात रहिमतपूर पासून ५ कि.मी. अंतरावर वसलेले आहे. या ठिकाणी गाडगेबाबा कीर्तनासाठी नेहमी येत. भाविकांच्या आग्रहास्तव त्यांनी विठ्ठल रूक्मिणीचे मंदिर बांधले आहे. याच जागेवर गाडगे महाराज मिशनमार्फत ज्ञानदानाचे कार्य सुरू आहे.[२४]

**ब्रम्हपुरी येथील शैक्षणिक शाखा :**

१. श्री गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा - स्थापना. १९६३

२. श्री गाडगे महाराज माध्यमिक आश्रमशाळा - स्थापना. १९७४

३. श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह - स्थापाना. १९७६

| तपशील | निवासी विद्यार्थी | | | अनिवासी विद्यार्थी | | | एकूण कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | |
| प्राथमिक आश्रमशाळा | ८५ | ३५ | १२० | ७० | ३१ | १०१ | ११ |
| माध्यमिक आश्रमशाळा | ६५ | १० | ७५ | २३ | ०१ | २४ | ११ |
| विद्यार्थी वसतिगृह | ४२ | १० | ४२ | - | - | - | ०२ |

श्री गाडगे महाराज मिशनचे माजी चेअरमन व अध्यक्ष थोर स्वातंत्र्य सैनिक ह.भ.प.वै. जिजाबा मोहिते (पाटील) सोहोलीकर यांच्या कुशल व कल्पक मार्गदर्शनातून झोपडीमध्ये भरणारी आश्रमशाळा १९७४ साली भव्य अशा स्लॅबच्या इमारतीत भरू लागली. तत्कालीन पाटबंधारे मंत्री मा.वसंतदादा पाटील यांच्या शुभहस्ते या इमारतीचे उद्घाटन झाले. सन १९९३ ते १९९४ श्री.जिजाबा मोहिते-पाटील या शाखेचे संचालक होते. त्यांच्या पश्चात त्यांचे नातू श्री.मधूसदन पंढरीनाथ मोहिते हे संचालक म्हणून कार्य पाहत आहेत. या शाळेच्या मालकीची ७ एकर २३ गुंठे जमीन आहे.

या शाळेस अनेक मान्यवरांनी भेटी देऊन शाळेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यामध्ये प्रसिद्ध लेखक गो.नी.दांडेकर, प्राचार्य शिवाजीराव भोसले, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, मा.आप्पासाहेब पवार इ. व्यक्तींचा समावेश होतो.या शाळेत अनेक समाजउपयोगी उपक्रम राबविले जातात.[२५]

❖ **गाडगे महाराज कन्या छात्रालय, पंढरपूर, जि. सोलापूर:**

या शाखेची स्थापना इ.स.१९६५ मध्ये झाली आहे. पंढरपूर परिसरातील दुरस्थ असणाऱ्या गावातून शिक्षण घेण्यास येणाऱ्या मुलींच्या भोजन व राहण्याची आणि अभ्यासाची गैरसोय व्हायची हे लक्षात घेऊन मिशनमार्फत हे कन्या छात्रालय सुरू केले आहे.[२६]

❖ **गाडगे महाराज विद्यालय, ओतूर, जि.पुणे :**

हे विद्यालय जून १९६८ साली मिशनमार्फत सुरू झाले आहे. स्थापनेवेळी विद्यार्थीसंख्या अवघी ३२ होती. मात्र आज या विद्यालयात ११३८ विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. शिक्षक संख्या ३२ पेक्षा जास्त असून १0 शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत. या शाळेला जोडूनच बालकमंदिराची स्थापना केली आहे.[२७]

❖ **गाडगे महाराज माध्यमिक आश्रमशाळा व माध्यमिक वसतिगृह,भिवाळी जि.ठाणे:**

ठाणे जिल्हयातील आदिवासी मुलांच्या इ.१0 वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय व राहण्याची सोय व्हावी या उद्देशाने मिशनमार्फत १ नोव्हेंबर १९७0 मध्ये सदरच्या शाखांची स्थापना झाली आहे. माध्यमिक आश्रमशाळेत ८१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाखेत मे महिन्यात गाडगेबाबांचा स्मृती सप्ताह साजरा केला जातो या शाळेचे संचालक म्हणून ह.भ.प.श्री.विश्वनाथ वाघबाबा मोठया प्रमाणात अन्नदान करत होते.या शाखेच्या नावे २२ एकर जमीन असून तेथे भातशेती केली जाते तसेच सामाजिक वनीकरण खात्यामार्फत वृक्षारोपण केले जाते. ही शाळा अनेक शासकीय पुरस्काराने सन्मानित आहे.[२८]

❖ **गाडगे महाराज पोस्टबेसिक विद्यालय, नवमहाराष्ट्र वसतिगृह व कन्या छात्रालय राहुरी जि.अहमदनगर :**

राहुरी या ठिकाणी मिशनची इ.७ पर्यंतची आश्रमशाळा होती. परंतु इ.७ वी नंतर घरच्या गरीब परिस्थितीमुळे व मागास समजूतीमुळे आदिवासी मुलांच्या शिक्षणात व्यत्यय येत होता. तो नाहीसा करण्यासाठी गाडगे महाराज मिशनने १९७२ साली सदरच्या शाखांची स्थापना केली. या शाळेत एकूण ४६0 विद्यार्थी-विद्यार्थीनी आणि १९ कर्मचारी आहेत. संचालकपदी तुकाराम धोंडिबा खांडवे (आण्णा) आहेत. या शाळेस नोबेल पारितोषिक विजेत्या मदर तेरेसा यांनी भेट देऊन शाळेच्या कार्यबद्दल गौरवोद्गार काढले आहेत.[२९]

## सारांश :

सन १९६२ ते १९७२ या कालखंडामध्ये श्री गाडगे महाराज मिशनने शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. या कालखंडात मिशनच्या नेतृत्वाखाली ५ प्राथमिक आश्रमशाळा, ३ माध्यमिक विद्यालये, ३ माध्यमिक आश्रमशाळा, ४ माध्यमिक वसतिगृहे, १ बालमंदिर, २ कन्या छात्रालये स्थापन झाली. त्यामुळे मिशनच्या स्थापनेपासून १९७२ पर्यंत मिशनच्या एकूण शाखा उपशाखांची संख्या ३७ पर्यंत गेली. मिशनच्या कार्यामुळे अहमदनगर, अमरावती, यवतमाळ, ठाणे, नांदेड, बुलढाणा, सातारा, पुणे, सोलापूर इत्यादी जिल्हयातील मुलामुलींच्या शिक्षणाची सोय झाली. तसेच संत गाडगे महाराज मिशनचे कार्यक्षेत्र विस्तारले व ते राज्याच्या नऊ जिल्हयात फैलावले.

## तिसरा टप्पा : (१९७२ ते १९८२ )

सन १९७२ ते १९८२ या कालखंडामध्ये श्री गाडगे महाराज मिशनने आपली शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नांदेड, पुणे, ठाणे, सातारा, अमरावती या पाच जिल्हयात एकूण १९ शैक्षणिक शाखांची स्थापना केली. त्याची थोडक्यात माहिती खालील प्रमाणे -

❖ **संत गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा व विद्यार्थी वसतिगृह साखरवाडी, ता. फलटण जि. सातारा :**

फलटण तालुक्यात साखरवाडी हे गाव आहे. या गावी एक साखरकारखाना व महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ आहे. साखरवाडीत या महामंडळाची हजारो एकर ऊसमळा असलेली बागायती शेती आहे. येथील शेतीवर काम करणाऱ्या मजूरांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून गाडगे महाराज मिशनने तेथे १५ ऑगस्ट १९७३ रोजी प्राथमिक आश्रमशाळेची व दि.१.२.१९९० रोजी मागासवर्गीय वसतिगृहाची स्थापना केली .

सदरच्या आश्रमशाळेत १२० निवासी विद्यार्थी, ६० मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. तसेच ११४ अनिवासी विद्यार्थी या ठिकाणी शिक्षणासाठी

येतात. या शाळेत एकूण १४ कर्मचारी कार्यरत असून श्री. मधुसुदन मोहिते व अशोक पाटील संचालक म्हणून काम पाहतात.[३०]

❖ **श्री गाडगे महाराज माध्यमिक वसतिगृह व आश्रमशाळा चालतवाढ, जि. ठाणे :**

ठाणे जिल्हयातील चालतवाढ या ठिकाणी आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांची राहण्याची व शिक्षणाची सोय करण्यासाठी मिशनमार्फत सन १९७३ साली सदरच्या शाखेची स्थापना केली. माध्यमिक आश्रमशाळेत २०४ विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यासाठी ६ शिक्षक व ४ शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत.

या शाखेची एकूण ७ एकर जमीन आहे, या जमीनीचा वापर इमारत व क्रिडांगणासाठी केला आहे. वृक्षारोपण, साक्षरता निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन यासारखे अनेक कार्यक्रम या शाखेमार्फत राबविले जातात. श्री विष्णूभाऊ नाचवणे हे संचालक म्हणून या शाखेचे काम पाहतात.[३१]

❖ **श्री गाडगे महाराज आदिवासी पोस्टबेसिक आश्रमशाळा भातसाई वासिंद, जि. ठाणे :**

ठाणे जिल्हयातील आदिवासी समाजाच्या विकास शासनाकडून अनेक उपक्रम राबविले जातात. त्याला पोषक वातावरण तयार करणेच्या हेतूने गाडगे महाराज मिशनने सदरच्या शाखेची स्थापना दि १0 जून १९७४ मध्ये केली. सुरूवातीच्या काळात या शाखेस मुलांच्या अल्प प्रतिसाद होता. पण सद्या या आश्रमशाळेत एकूण १२२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पैकी ४४ विद्यार्थी निवासी आहेत. या शाखेत नित्याच्या शैक्षणिक उपक्रमाबरोबर राष्ट्रीयदिन, भजन-कीर्तन असे अनेक उपक्रम राबविले जातात.[३२]

❖ **श्री गाडगे महाराज पोस्टबेसिक आश्रमशाळा व वसतिगृह सिताखंडी, पो. वाकर ता. भोकर, जि. नांदेड :**

सदरच्या शाखेची स्थापना १४ जानेवारी १९७३ मध्ये झाली. त्या शाखेत ७५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यासाठी ५ शिक्षक व ३ शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत.

या शाखेस वनखात्यामार्फत देणगीरूपाने १५ एकर डोंगराळ जमीन मिळालेली आहे. याच ठिकाणी शाळेची इमारत व क्रिडांगण आहे. शिवाय १९ एकर जमीन या शाखेने विकत घेतली आहे. म्हणजेच एकूण ३४ एकर जमीन या शाखेच्या मालकीची आहे.

सिताखंडी शाखेचे तत्कालीन संचालक व गाडगे महाराज मिशनचे माजी खजिनदार कै.नारायणरावजी ढाणकीकर महराज यांनी स्वामी रामानंदतीर्थ यांचे नेतृत्वाखाली हैद्राबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला होता. दि ७ ऑगस्ट १९४७ रोजी सभाबंदी मोडून त्यांनी जाहीर सभा घेतली. त्यासाठी त्यांना २ वर्षे १ महिना सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागली. त्याच्या या कार्याबद्दल त्यांना भारत सरकारने 'स्वातंत्र्य सैनिक' ही पदवी, ताम्रपट व पेन्शन देऊन गौरवले आहे. [३३]

❖ **श्री गाडगे महाराज निराधार बालकाश्रम, दर्यापूर जि.अमरावती :**

समाजात असंख्य मुले अशी आहेत की त्यांना आपले आई-वडील कोण आहेत हे माहित नसते. ती निराधार अवस्थेत जीवन कंठीत असतात अशा मुलांना आसरा देऊन त्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मिशनमार्फत श्री गाडगेबाबांच्या जन्म गावी सदरचे निराधार बालकाश्रम सन १९८१ मध्ये सुरू करण्यात आले. नंतर या बालकाश्रमाचे स्थलांतर दर्यापूर या ठिकाणी केले. या बालकाश्रमात एकूण ३२ मुला-मुलींना आश्रय दिला जातो. ही मुले ३ ते १८ या वयोगटातील असतात. या शाखेमार्फत अत्यल्प खर्चात मुला-मुलींची लग्न लावून देण्याची सोय करण्यात आलेली आहे. या शाखेचा कारभार संचालक बापूसाहेब देशमुख पाहतात. [३४]

❖ **संत गाडगे महाराज भटक्या / विमोचितजाती आश्रमशाळा, ताथवडा. ता.फलटण, जि.सातारा :**

फलटण तालुक्यातील ताथवडा घाटाच्या पायथ्याशी वसलेले ताथवडा हे लहान गाव आहे.डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टीकोनातून मा. यशवंतराव कृष्णाजी माने यांच्या मार्गदर्शनाखाली सदरच्या शाखेची स्थापना १२

जून १९८३ मध्ये करण्यात आली. प्रथमवर्षी फक्त १८ विद्यार्थी शिक्षण घेत होते तर आज तेथे ३१० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

या शाखेची स्वत:च्या मालकीची २ एकर ४ गुंठे जमीन आहे. याशिवाय सार्वजनिक बांधकाम खात्याने २ एकर जमीन देणगी रूपाने दिली आहे. या शाखेचे संचालक श्री. मारूती शिंदे महाराज हे कीर्तनाद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य करतात.

याशिवाय गाडगे महाराज मिशनमार्फत सन १९७२ ते १९८२ या कालखंडात गोंदवले (ता. माण जि. सातारा), ब्रम्हपुरी (जि. चंद्रपूर) या ठिकाणी अनुक्रमे माध्यमिक शाळा आणि माध्यमिक वसतिगृहे स्थापन केलेली आहेत.[३५]

**चौथा टप्पा** : (सन १९८२ ते १९९२)

सन १९८२ ते १९९२ या कालखंडामध्ये गाडगे महाराज मिशनने विविध क्षेत्रात भरीव कार्य करण्यासाठी मागासलेल्या जाती जमातींच्या व आदिवासी समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी सातारा, अहमदनगर, बुलढाणा, चंद्रपूर, ठाणे, यवतमाळ, वर्धा, अमरावती, या जिल्हयात रूग्णांच्या अनेक ठिकाणी आश्रमशाळा, वसतिगृहे, कन्या छात्रालये सुरू केली आहेत. तसेच रूग्णांच्या सेवेसाठी मुंबई या ठिकाणी धर्मशाळेची स्थापना केली आहे. या सर्व कार्याची माहीती पुढीलप्रमाणे -

❖ **श्री गाडगे महाराज प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा व वसतिगृह वरवंडी ता. राहुरी, जि. अहमदनगर :**

वरवंडी हे मागासलेले व अविकसित गाव होते. तेथे मोठया प्रमाणावर पशुहत्या होत होती. ती गाडगेबाबांनी बंद केली. गाडगेबाबांच्या मृत्यूनंतर सन १९८३ साली भटक्या व विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याच्या हेतूने येथे वरील शाखा सुरू करण्यात आल्या आहेत.[३६]

❖ **श्री गाडगे महाराज आश्रमशाळा व कन्या छात्रालय भानसहिवरे, ता. नेवासा जि. अहमदनगर :**

अहमदनगर जिल्हयातील भटक्या-विमुक्त, जाती-जमातीतील बहुसंख्य

विद्यार्थी घरच्या दयनीय आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित होते. अशा मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी गाडगे महाराज मिशनने काही आश्रमशाळा व कन्याछात्रालये सुरू केली आहेत. भानसहिवरे येथे असणारी आश्रमशाळा व कन्याछात्रालय त्यापैकीच एक आहे. सदरच्या शैक्षणिक उपक्रमाची स्थापना अनुक्रमे जून १९८७ व जून १९९० मध्ये करण्यारत आली.

या आश्रमशाळेत एकूण २८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तर कन्या छात्रालयमध्ये २५ मुली आहेत. दोन्ही शाखेत एकूण १४ कर्मचारी कार्यरत आहेत. श्री. तुकाराम धोंडिबा खांडवे हे या शाखेचे संचालक म्हणून कार्यभार सांभाळतात.[३७]

❖ **श्री गाडगे महाराज प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा वळण, ता. राहुरी जि. अहमदनगर :**

नेवासा तालुक्याच्या ठिकाणापासून १८ कि. मी. अंतरावर व श्री क्षेत्र शनिशिंगणापूर पासून १५ कि. मी. अंतरावर वळण हे गाव आहे. या गावातील ग्रामस्थांच्या आग्रहास्तव सद्गुरू गाडगेमहाराजांच्या कार्यप्रेरणेने श्री गाडगे महाराज मिशनचे विद्यमान सचिव मा. श्री. तुकाराम धोंडिबा खांडवे यांनी सदरच्या शाखेची स्थापना अनुक्रमे जून १९८९ व जून १९९५ साली केली.

या शाळेत श्रीरामपूर, राहुरी, नेवासा, पैठण इत्यादी तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. प्राथमिक आश्रमशाळेत ३९३ विद्यार्थी आणि माध्यमिक आश्रमशाळेत २२४ विद्यार्थी असे एकूण ६०७ विद्यार्थी तेथे शिक्षण घेत आहेत. त्यासाठी एकूण २६ कर्मचारी कार्यरत आहेत.

या शाळेस कै. हौसाबाई पैठणकर यांनी १५ एकर शेत जमीन दान दिली आहे.[३८]

❖ **गाडगे महाराज वृद्धाश्रम व पाळणाघर, दहिगांव जि. बुलढाणा :**

मानवी जीवनातील अतीव असाहयकारक अवस्था म्हणजे वृद्धावस्था होय. या अवस्थेत शारीरिक दुर्बलता, वैचारिक वैफल्य व मतभेद आणि आर्थिक



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

अडचणी यातून बऱ्याच कुटुंबातून वृद्ध व्यक्तींसाठी असहकार सुरू होतो. ही गोष्ट लक्षात घेऊन मिशनने श्री गाडगे महाराज यांच्या नावे सदरच्या वृद्धाश्रमाची स्थापाना २० डिसेंबर १९८५ रोजी करण्यात आली आहे. सद्या या वृद्धाश्रमात २७ वृद्ध महिला आणि ३३ वृद्ध पुरूष अशी एकूण ६० वृद्ध मंडळी आपले उरलेले आयुष्य आनंदाने जगत आहेत.

या वृद्धाश्रमास समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून अनुदान रूपाने देणगी मिळते. दि.१० जून १९८५ साली लहान मुलामुलींच्या संगोपानासाठी मिशनमार्फत पाळणाघर स्थापना करण्यात आले. या पाळणाघरात २३ मुली व २७ मुले आहेत. त्यांच्या संगोपनासाठी समाजकल्याण सल्लागार बोर्ड, मुबंई. यांच्याकडून अनुदान रूपाने देणगी प्राप्त होत असते. सदरच्या दोन्ही शाखा मिशनच्या मालकीच्या आहेत.[३९]

❖ **श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह व कन्या छात्रालय, दहिगाव. ता.नंदुरा, जि. बुलढाणा :**

दहिगाव या ठिकाणी श्री गाडगे महाराज मिशनचे एक हायस्कूल आहे. या हायस्कूलमधील विद्यार्थ्यांच्या भोजन व राहण्याची सोय व्हावी या दृष्टीकोनातून १९८६ साली या वसतिगृहाची स्थापाना करण्यात आली. या वसतिगृहात एकूण ४२ विद्यार्थी राहतात. तसेच १९८६ साली मुलींच्या सोयीसाठी श्री गाडगेबाबांच्या नावे कन्याछात्रालय सुरू केले आहे. येथे २८ विद्यार्थीनी राहतात व शिक्षणाचा लाभ घेतात.[४०]

❖ **श्री गाडगे महाराज मिशन धर्मशाळा दादर.मुंबई :**

मुंबई हे महाराष्ट्राच्या राजधानीचे ठिकाण. येथे टाटा हॉस्पिटल, गांधी हॉस्पिटल, के.ई.एम हॉस्पिटल, इ हॉस्पिटल्स आहेत. वरील हॉस्पिटल मध्ये कॅन्सर, हार्ट, किडणी, ब्रेनट्युमर, अर्थोपॅडीक, स्कीन, पॅरॅलेसीस वगैरे आजार व रोगांनी ग्रस्त असणाऱ्या पेशंटची राहण्याची गैरसोय होई. ते हॉस्पिटलमध्ये प्रवेश मिळेपर्यंत या हॉस्पिटलच्या कंपाऊंड बाहेर दैन्यावस्थेत राहत. हे पाहून श्री गाडगे महाराज मिशनचे

प्रतिनिधी कै. गुणवंतराव चऱ्हाटे (काही काळ गाडगेबाबांच्या सानिध्यात होते ) आणि त्यांचे सहकारी यांनी तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतदादा पाटील यांना दादरपूर्व भागातील महानगरपालिकेच्या प्रसुतीगृहाकरीतां राखीव असलेल्या भूखंडाची माहिती दिली व सदरच्या भूखंडाची मागणी केली. कै. वसंतदादांनी शासनामार्फत हा भूखंड सन १९८४ साली १० लक्ष रूपयाला गाडगे महाराज मिशनला दिला.

या भूखंडावर इमारत बांधण्यासाठी श्री गाडगेबाबांचे भक्त कै. गोकुळभाई दोशी (अमरावती) यांनी व त्यांचे मुंबईतील नातेवईक कै. श्रीमंत शेठ नगिनभाई शहा, श्रीमंत शेठ मेहतलालजी मेहता (चेअरमन दिवालीबेन ट्रस्ट, मुंबई) यांनी जवळ-जवळ ३५ लाख रूपये आर्थिक साहय केले. तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून गाडगेबाबांच्या भक्त मंडळीनी आर्थिक मदत करून ९० लाख रूपये जमविले. या देणगीतून मुंबईत सन १९८५ साली ८१ खोल्यांची भव्य अशी ५ मजली इमारत बांधण्यात आली.[४१] ह्या धर्मशाळेत सन १९८७ पासून भारत व श्रीलंका, नेपाळ, बांग्लादेश, शेजारील देशातील एकूण १५ लाख लोक राहून गेले आहेत.

धर्मशाळेत राहत असलेल्या पेशंटला दररोज दोन वेळचे जेवण फक्त ३ रूपयास दिले जाते. सन २००२-०३ या वार्षात ५२००० हजार लोकांनी या भोजनाचा घेतला आहे. धर्मशाळेत मृत्यू पावलेल्या पेशंटच्या अंत्यविधीसाठी मदत केली जाते.

या धर्मशाळेस अमेरिका, रशिया, कॅनडा, बेल्जियम, इटाली, इंग्लंड इत्यादी देशातील कॅन्सर रिसर्च सोसायटीच्या प्रतिनिधींनी व सामाजिक संस्थांनी भेटी दिल्या आहेत.[४२]

### ❖ श्री बिरोबा विद्यालय, पांगरी. ता. माण जि. सातारा :

दहिवडी फलटण रस्त्यावरील धनगर समाजाचे अराध्य दैवत असणाऱ्या बिरोबा मंदिराच्या इमारतीमध्ये १३ जून १९८८ रोजी या शाखेची स्थापना केली. यासाठी 'माणभूषण' व 'दलितमित्र' पुरस्काराने सन्मानित श्री. यशवंत कृष्णाजी माने यांनी पुढाकार घेतला होता. त्यांना पांगरी गावचे ग्रामस्थ चंद्रकांत दडस, शहाजी भिकू दडस,

बापुराव बनाजी दडस व येळेवाडी गावचे माजी सरपंच, गाडगे महाराज मिशनचे विद्यमान संचालक शिवाजीराव महानवर यांनी मोलाचे सहकार्य केले.

हे विद्यालय काहीकाळ कै.भैरू दडस यांच्या घरामध्ये भरत होते. नंतर श्री.अरूण संभाजी खरात यांनी शाळेस मोफत जागा दिली. आज या विद्यालयाची प्रशस्त ८ खोल्यांची स्लॅबची स्वतंत्र इमारत आहे. या विद्यालयामध्ये पांगरी, वडगाव, मुलाणीवस्ती, बिजवडी, वावरहिरे, येळेवाडी, मोरदरा, या परिसरातील विद्यार्थी येतात. या परिसरात बहुसंख्य लोक धनगर व वंजारी समाजाचे आहेत. ५ जुन १९९४ पासून या शाखेस १00 टक्के अनुदान मिळाले.

सद्या गाडगे महाराज मिशनच्या या विद्यालयात १८८ मुले व १३२ मुली असे एकूण ३२0 विद्यार्थी १0 वी पर्यतच्या शिक्षणाचा लाभ घेत आहेत. या शाळेची उज्ज्वल निकालाची परंपरा आहे. सदरच्या विद्यालयात मागासवर्गीय व गोरगरीब मुलांची भोजन आणि राहण्याची सोय व्हावी म्हणून मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह सुरू केले आहे. सद्या ३0 विद्यार्थी या वसतिगृहाचा लाभ घेतात. श्री.कोंडिबा सिताराम तांबे हे मुख्याध्यापक म्हणून कार्य पाहतात तर श्री.बाळासाहेब यशवंतराव माने संचालक पदाची धुरा सांभाळत आहेत.[४३]

याशिवाय सातारा जिल्हयातील दुर्गम भाग म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या तोंडले (ता.माण) व इंजबाव (ता.माण) येथे श्री गाडगे महाराज मिशनची माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत.[४४]

सारांश रूपाने असे म्हणता येईल की, सन १९८२ ते १९९२ या दशकात वरवंडी, पांगरी, दहिगाव, मुंबई, ब्रम्हपुरी (चंद्रपूर), दाभोळ, अकोला, भानसहिवरे, जुनागड, वर्धा, इंजबाव, वळण, ताथवडा, तोंडले, गोंदवले, टाकळी, काजी, साखरवाडी, ढाकरमल, मुलवड, बेलवड इत्यादी अनेक ठिकाणी गाडगे महाराज मिशन मार्फत एकूण ३१ शाखा उपशाखा सुरू केलेल्या दिसून येतात.[४५]

या कालखंडाचे वैशिष्ट्य म्हणजे गाडगे महाराज मिशनचा सर्वात जास्त शाखा विस्तार या कालावधीत झालेला आहे.

## पाचवा टप्पा : (इ.स.१९९२ ते २००२)

सन १९९२ ते २००२ या कालखंडामध्ये गाडगे महाराज मिशनने वळण, सावेडी, मिरपूर, भानसहिवरे. (जि.अहमदनगर) वडगांव, दहिगांव (जि.बुलढाणा), येळेवाडी, बिजवडी, दानवलेवाडी, सेवरी (जि.सातारा), मुर्तिजापूर (जि.अकोला), ढकरमल (जि.अमरावती) अशा वेगवेगळया ठिकाणी शैक्षणिक शाखा सुरू केल्या आहेत. त्याची माहिती पुढीलप्रमाणे -

❖ **श्री गाडगे महाराज प्राथमिक व माध्यमिक आश्रशाळा, ढाकरमल ता.धारणी, जि.अमरावती :**

संत गाडगेबाबांच्या ध्येयधोरणानुसार अमरावती जिल्हयातील मेळघाट या आदिवासी भागात ढाकरमल या गावी मिशनद्वारे आदिवासी मुलामुलींना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी सन १९९२ मध्ये सदरच्या शाखेची स्थापना करण्यात आली.

या दोन्ही शाखेत एकूण ४०० आदिवासी विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांची भोजन व राहण्याची सोय करण्यासाठी मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे स्थापन करण्यात आली आहेत. या शाखेकडे २ एकर ६ आर जमीन आहे. या शाखेमार्फत भजन, कीर्तन, ग्रामस्वच्छता, जनजागृती, आरोग्यविषयक शिबीरे आयोजित केली जातात.

महाराष्ट्र राज्यशासनाच्या 'श्री गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' मोहिमे अंतर्गत सन २००१-२००२ मध्ये मिशनच्या ढाकरमल आश्रमशाळेस अमरावती जिल्हयात तिसरा क्रमांक व रोख रूपये २,२५००० रूपये बक्षिस मिळाले आहे. श्री.ज्ञानदेव पाटील हे संचालक म्हणून या शाखेचे काम पाहतात. [४६]

❖ **श्री गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा येळेवाडी पो.बिजवडी ता.माण जि.सातारा :**

येळेवाडी हे डोंगराळ भागात वसलेले धनगर समाजाचे गाव आहे. धनगर व इतर मागासवर्गीय समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी या प्रमुख उद्देशाने या गावचे ग्रामस्थ श्री.शिवाजीराव महानवर (संचालक गाडगे महाराज मिशन) यांच्या पुढाकाराने १९९८ मध्ये या शाखेची स्थापना करण्यात आली. यासाठी श्री यशवंतराव मानेबाबा यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. या शाळेत इ.१ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग असून १२० निवासी, आणि १४२ अनिवासी विद्यार्थी असे एकूण २६२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाखेमार्फत गाडगेबाबांच्या पुण्यतिथी निमित्ताने भजन, कीर्तन, व ग्रामस्वच्छता केली जाते तसेच आरोग्यविषयक शिबीरे आयोजित केली जातात. या शाखेची मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे आहेत. त्यासाठी १३ कर्मचारी कार्यरत आहेत. सद्या श्री.शिवाजीराव महानवर हे संचालक तर नंदकुमार भिसे हे मुख्याध्यापक म्हणून कार्यभार संभाळत आहेत.[४७]

❖ **श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह व बालसदन भुसावळ जि.जळगाव :**

भुसावळ या ठिकाणी शिक्षणासाठी येणाऱ्या बहिस्थ विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी गाडगे महाराज मिशनचे चेअरमन राजाराम बापू घोंगटे, बापूसाहेब देशमुख, गोकुळ महाराज यांनी अनुक्रमे सन १९९४ व सन १९९५ साली बालसदन व विद्यार्थी वसतिगृह सुरू केले.अनाथ बालसदनात १० विद्यार्थी आणि वसतिगृहात ४० विद्यार्थी आहेत.[४८]

❖ **श्रीमती अनुसयाबाई घोलप प्राथमिक आश्रमशाळा, मिरपूर ता.संगमनेर, जि.अहमदनगर :**

या प्राथमिक आश्रमशाळेची स्थापना १८.०९.१९९६ रोजी झाली. ही शाळा राष्ट्रीय समता अभियान नाशिक संचलित श्रीमती अनुसयाबाई शं घोलप या नावाने सुरू होती. या शाळेचे हस्तांतर सन १९९७ मध्ये श्री गाडगे महाराज मिशन मुंबई.४ कडे

करण्यात आले. या शाळेसाठी ९ कर्मचारी वर्ग आहे मिशनने या शाळेला जोडून वसतिगृह सुरू केले आहे. यामध्ये १२० निवासी मुले आहेत.[४९]

❖ **श्री गाडगे महाराज केंद्रीय एस.सी. आश्रमशाळा बिजवडी. ता. माण, जि.सातारा :**

बिजवडी परिसरातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टीने विचार करून श्री.शिवाजीराव महानवर यांनी या शाखेच्या स्थापनेत पुढाकार घेतला. त्यासाठी त्यांनी दिल्लीच्या अनेक फेऱ्या करून केंद्र सरकारकडून मान्यता मिळविली आणि सन २000 मध्ये सदरच्या शाखेची स्थापना केली.

या शाळेच्या उद्घाटन सोहळयाचा समारंभ श्री.यशवंत माने ( विद्यमान कार्यकारी अध्यक्ष गाडगे महाराज मिशन ) यांच्या हस्ते झाले. आज या शाळेत इयत्ता १ ली ते ७ वी पर्यतचे वर्ग सुरू आहेत.या शाळेत मुलांना ने-आण करण्यासाठी शाळेच्या मालकीची स्वतंत्र बस आहे.

आज या शाळेत बिजवडी, राजवडी, पाचवड, मोगराळे, जाधववाडी, वडगांव, पांगरी, येळेवाडी या परिसरातील १२८ मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर असे एकूण ११ कर्मचारी कार्यरत आहेत. या शाळेमार्फत दारूबंदी, हिंसाबंदी, वृक्षारोपण, गाडगेबाबांची पुण्यतिथी इत्यादी उपक्रम राबविले जातात. श्री शिवाजी महानवर संचालक म्हणून काम पाहतात आणि श्री. लक्ष्मण गणपत महानवर हे मुख्याध्यापक म्हणून कार्यभार संभाळत आहेत.[५०]

❖ **श्री गाडगे महाराज आश्रमशाळा, मुलवड ता.पेठ जि. नाशिक :**

नाशिक जिल्हयातील आदिवासी भागातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय करणेसाठी गाडगे महाराज मिशनच्या पुढाकाराने, स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने १ जुलै १९९२ रोजी या प्राथमिक आश्रमशाळेची स्थापना केली आहेत तसेच सन २00३ मध्ये याच ठिकाणी माध्यमिक आश्रमशाळा सुरू केली आहे.

प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत एकूण ३८० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाखेचे संचालक म्हणून श्री. अशोकराव देशमुख हे कामकाज पाहतात.[५१]

**कार्यविस्ताराची वैशिष्टये :**

श्री गाडगे महाराज मिशन या संस्थेची स्थापना दिनांक ८ फेब्रुवारी १९५२ रोजी श्री संत गाडगे महाराज यांनी केली. या सेवाभावी व शैक्षणिक संस्थेने वेगवेगळया क्षेत्रात उल्लेखनिय कार्य चालविले आहे. या कार्याची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. गाडगे महाराज ही संस्था प्रामुख्याने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी संस्था आहे.

२. गाडगे महाराज मिशनने सन १९५२ साली राहुरी या ठिकाणी महाराष्ट्रातील पहिली आश्रमशाळा सुरू केली.

३. या संस्थेचे अनेक सेवक कीर्तन या समाजप्रबोधनाच्या माध्यमाद्वारे दारूबंदी, हिंसाबंदी, अस्पृश्यता निवारण, पर्यावरण संरक्षण, शिक्षण प्रसार, अंधश्रद्धा निर्मूलन... इ. बाबतीत जनजागरण करत आले आहेत.

४. या संस्थेच्या कार्याचा विस्तार महाराष्ट्रातील २२ पेक्षा अधिक जिल्हयात झालेला दिसून येतो.

५. संत गाडगे महाराजांचा १0 कलमी संदेश-भूकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघडयानागडयांना वस्त्र... संस्थेच्या कार्याचा आत्मा आहे.

६. अनेक महनीय व्यक्तींनी संस्थेच्या शाखा उपशाखांना भेटी देऊन संस्थेच्या एकूण कार्याबद्दल गौरवोद्गार काढलेले आहेत.

७. या संस्थेने आदिवासी समाजासाठी केलेले विशेष कार्य उल्लेखनीय आहे.

८. या संस्थेला अनेक शासकीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

९. या संस्थेने महारोग्यांची सेवा करण्यासाठी दवाखाने सुरू केलेले दिसून येतात.

**समारोप :**

सन १९५२ मध्ये स्थापन केलेल्या गाडगे महाराज मिशनचे आज विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गाडगे महाराज मिशनने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. मिशनच्या आज ११२ पेक्षा अधिक शैक्षणिक शाखा-उपशाखा कार्यरत आहेत.

गेल्या पाच दशकात मिशनच्या पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रमाद्वारे लोकजागृतीचे कार्य केले आहे, ४0 हजार पेक्षा अधिक विद्यार्थी, ५0 निराधार बालके, २५0 वृद्ध गाडगे महाराज मिशनच्या सेवा कार्याचा लाभ घेत आहेत. मिशनचे कार्य वाढतच चालले आहे.

मिशनच्या कार्याचा गौरव म्हणून इ.स १९८६-१९८७ मध्ये गाडगे महाराज मिशनला महाराष्ट्र शासनातर्फे 'दलितमित्र संस्था' व सन १९८७-८८ मध्ये 'आदिवासी सेवक संस्था' असे दोन पुरस्कार मिळाले आहेत. यातूनच मिशनच्या एकूण कार्याचे वेगवेगळेपण दिसून येते.

## संदर्भ साधने :


१. पाटील प.ह., तोचि साधू ओळखावा, २००२, पृ. - १०.

२. Education activities of shree Gadge Maharaj Mission, p.- 7.

३. पाटील प.ह., उपरोक्त, पृ. -१०.

४. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९२-१९९३, पृ. -१.

५. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई, ध्येय व धोरण आणि नियम व कानुन, १९८७, पृ. - १

६. श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई ध्येय व धोरण आणि नियम व कानुन, पृ.- १, २

७. कित्ता, पृ.- १२.

८. जोशी ओंकारनाथ (संपा.), श्री गाडगे बाबा त्रैमासिक, (जूलै, ऑगस्ट, सप्टेंबर), १९८९, पृ.-३२.

९. खांडवे तु.धों. (संपा.) गाडगे महाराज मिशन मुंबई, सुवर्णमहोत्सव विशेषांक, १९५२-२००२ पृ.- १६, १७, १८.

१० खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ.- ६१, ६२.

११. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९१-९२, पृ. – ५.

१२. श्री गाडगे महाराज विमोचित जाती आश्रम शाळा, गोंदवले ता.माण, जि.सातारा या शाखेचे संचालक बाळासाहेब यशवंतराव माने यांची दि.५.०९.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

१३. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९१-९२, पृ. – १०, ११ .

१४. खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ. – १३४.

१५. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल , सन १९९१-९२, पृ. – ५४.

१६. कित्ता, पृ. – ११.

१७. कित्ता , पृ. – १३, १४, १५, १६, २१.

१८. कित्ता, पृ. – १९.

१९. कित्ता, पृ. – २०.

२०. कित्ता, पृ. – २४, २५.

२१. खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ. – ९६, ९७.

२२. कित्ता, पृ. – १०८.

२३. कित्ता, पृ. – १०९.

२४. श्री गाडगे महाराज आश्रमशाळा ब्रम्हपुरी (ता.कोरेगाव, जि.सातारा) या शाळेचे संचालक श्री. मधुसुदन मोहिते यांची दिनांक ०२.०८.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

२५. खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ. – ८४, ८५.

२६. कित्ता, पृ. – १३७.

२७. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९१-९२, पृ. – १६, १७.

२८. खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ. – ११६, ११७.

२९. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई, अहवाल सन १९९१-९२, पृ. – ३, ४.

३०. खांडवे तु.धो. (संपा.), उपरोक्त, पृ. – ८३.

३१. कित्ता पृ. – ११४.

३२. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९१-९२, पृ. – ३४.

३३. कित्ता, पृ. – ३२, ३३.

३४. कित्ता, पृ. – ३९, ४०.

३५. संत गाडगे महाराज भटक्या विमोचित जाती आश्रमशाळा, ताथवडा ता.फलटण, जि.सातारा येथील शाखेचे संचालक श्री. मारूती शिंदे यांची दि.५.०८.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

३६. खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ. – ६८, ७०.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

३७. कित्ता, पृ. – ७१, ७२.

३८. कित्ता, पृ. – ६४, ६५.

३९. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९१-९२, पृ. – २९, ३५.

४०. कित्ता, पृ. – ३६, ३७.

४१. खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ. – १३०.

४२. कित्ता, पृ. – १३१, १३२.

४३. श्री बिरोबा विद्यालय पांगरी ता.माण, जि.सातारा या शाखेचे मुख्याध्यापक श्री. कोंडिबा सिताराम तांबे यांची दि.८.९.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

४४. खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ. – ९३, ९४.

४५. कित्ता, पृ. – १७, १८.

४६. कित्ता, पृ. – १०४.

४७. श्री संत गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा येळेवाडी ता.माण, जि.सातारा या शाखेचे मुख्याध्यापक श्री.नंदकुमार भिसे यांची दि.१०.०९.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

४८. खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ. – १३८.

४९. कित्ता, पृ. – ७२.

५०. श्री गाडगे महाराज केंद्रीय एस.सी.आश्रमशाळा बिजवडी ता.माण जि.सातारा या शाखेचे मुख्याध्यापक श्री.लक्ष्मण गणपत महानवर यांची दि.१२.९.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

५१. खांडवे तु.धों. (संपा.), उपरोक्त, पृ. – ११८.